


सद्‌गुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज
गिरगांव–मुंबई

प्रश्न :– महाराज! धर्म, अर्थ, काम, व मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत; त्यात सर्व श्रेष्ठ पुरुषार्थ कोणता? व तो सर्वांना प्राप्त होऊ शकतो का ? की ज्यांचे दैव बलवत्तर आहे त्यांनाच प्राप्त होतो ? ज्यांचे दैव बलवत्तर नाही त्यांचे प्रयत्न निष्फळ होतात का ?

उत्तर :– धर्म, अर्थ, काम हे जीवाच्या बंधाला कारण होतात तर मोक्ष हा बंधातून मुक्त करणारा आहे. महान सत्पुरुषांना–संतांना–ऋषिंना भौतिक जगातील वस्तुंची इच्छाच नव्हती, या सर्व सत्पुरुषांनी विश्वाच्या स्वरूपाचा विचार करून त्यांनी हे अनुभवले होते; की भौतिक सुखे ही क्षणभंगुर आहेत. ती प्राप्त होण्याने कोणालाही चिरंतन सुखाची प्राप्ती होणे शक्य नाही. अखिल विश्वातील पशुपक्षांपासून मानव–देव, या योनितील जीव ज्या ठीकाणी मरण पावतात त्या त्या वेळी त्या जीवाच्या ठिकाणी असलेले वासनामय सूक्ष्म शरीर आपल्या वासनांनुरूप शरीर धारण करून या जगात वावरत असतात. माणसाला भोवळ आली की पृथ्वी फिरत असल्याचा भास होतो. जलद चालणाऱ्या वाहनात आपण बसलो तर झाडे चालल्याचा भास निर्माण होतो. तशीच या संसाराची स्थिती आहे. पूर्ण पुरुषच जीवाचे मुख्य शुद्ध स्वरूप आहे. आपण आपल्याला जीवच समजतो. जगाशी अनेक दिवसांच्या परिचयाने पंचिकरणाच्या योगे तेही घन झाल्यामुळे या जगातील जड उपाधिशी बांधले गेले आहोत. त्यामुळे आपले स्वरूप नाना विकारांनी आच्छादिले आहे. जग सत्य आहे असे जीवाला वाटू लागते. जगाच्या अस्तित्वाचा भ्रम अविद्येने होतो. अविद्या ही अनंत असून तिला अनंत फाटे फुटतात. अविद्येमुळे आपण शरीर, मन, बुद्धि यांनाच आपले रुप समजत असतो. आणि त्यामुळे आपण निरंतर बंधन आणि दुःखाचा अनुभव घेत असतो. अविद्येमुळे मनुष्य आत्मघात करुन घेत असतो. आपले कल्याण व्हावे असे ज्याला वाटत असेल त्या प्रत्येकाने क्षणभंगुर संसारभोगात फसून न जाता आत्मतत्वाचा बोध प्राप्त व्हावा म्हणून प्रयत्नशील असले पाहिजे. तसे जर प्रयत्न केले नाहीत तर जन्म- मृत्युच्या जबड्यातून माणसाची सुटका नाही. चौऱ्यांशी लक्ष योनित वारंवार प्राप्त होणाऱ्या घोर संकटांतून पार होण्यासाठी परमानंद स्वरूप मोक्षाच्या प्राप्तीसाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत.

**बहूतां सुकृती नरदेह लाभला। भक्तिविण गेला अधोगती ॥**

**धर्म-काम-अर्थ-मोक्ष हे चार प्रकारचे पुरुषार्थ आहेत. परंतु या पुरुषार्थात परम श्रेष्ठ मोक्षच मनुष्याचे अंतिम ध्येय असले पाहिजे.** मोक्ष हा अमृतस्वरुप आहे. त्याच्या प्राप्तीने जीवाची सर्व बंधनातून मुक्तता होते. या मोक्षाच्या प्राप्तीसाठी मनुष्य जन्म हा सुवर्ण - योग आहे. कारण मनुष्य जन्य घेतल्याशिवाय अन्य कोणत्याही जीवाला त्या योनीत राहून कैवल्य मोक्षाची प्राप्ती होऊ शकत नाही. म्हणून मानव जन्माला अत्यंत दुर्लभ मानले आहे. प्रत्येक मनुष्याने आपण आपले मुख्य लक्ष जो मोक्ष आहे. त्याच्या सिद्धीसाठी दिवस -रात्र प्रयत्न केले पाहिजेत. जर तो असा प्रयत्न न करता विषयभोगात फसून रागद्वेषाचा अंकित होऊन विषयभोगांच्याच प्राप्तीसाठी प्रयत्न करत राहिल तर त्याच्यासारखा मूर्ख तोच! दुर्लभ मानव जन्म मिळूनसुद्धा मानव आपल्या मुक्तिसाठी प्रयत्न न करतात अनित्य भोगातच आसक्त राहिल्यामुळे स्वतःच स्वतःला विनाशाच्या खोल गर्तेत ढकलून देत असतो, म्हणून जीवाने या सांसारिक विषयभोगात फसून न जाता आत्मबोध प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्नशील असले पाहिजे.

कौणतीही गोष्ट दैवाने मिळते; असे म्हणणे म्हणजे आपल्या दुर्बलतेचे प्रदर्शन करण्यासारखे आहे. दैव म्हणजे पूर्वजन्मी केलेला पुरुषार्थ. या शिवाय दैव अशी कोणतीच गोष्ट नाही. मी स्वतंत्र नसून दैवाधिन आहे. दैव अनुकुल असेल तर ते मला आपोआप प्राप्त होईल. असले दुबळे विचार दूर करुन मनुष्याने सत्पुरुषांचा सहवास, गुरुसेवा व सत्शास्त्रांच्या अभ्यासाने, त्यांनी दाखवलेल्या मार्गाने श्रद्धा, सत्कर्म भक्ति व साधना न सोडता सतत नेटाने प्रयत्न करून जीवाने आपला उद्धार करून घ्यावा. जीव ज्याप्रमाणे प्रयत्न करील त्याप्रमाणे त्याला लवकर फळ प्राप्त होईल. याला पुरुषार्थ किंवा दैव म्हणतात. तुच्छ भौतिक सुखाच्या लोभाने पूर्वजन्मी केलेले जे कर्म असते त्यामुळे या जन्मी प्राप्त झालेल्या परिस्थितीला दैव म्हणणारे लोक दीनदुबळे होत. एखाद्या गोष्टीची प्राप्ति व्हावी अशी इच्छा ज्यावेळी माणसाच्या मनात निर्माण होते त्यानुसार तो प्रयत्न करीत राहतो आणि ती गोष्ट त्याला प्राप्त होते. ज्या लोकांना ती प्राप्त न होता असफल होतात त्याचे कारण त्या लोकांनी सम्यक प्रयत्न न केल्याने असफलतेला प्राप्त होतात. सतत प्रयत्न करणारा विवेकशिल बुद्धिमान आणि साहसी पुरुष अशक्य वाटणाऱ्या गोष्टी सुद्धा शक्य करून दाखविण्यास समर्थ ठरतो मग पूर्वजन्मातील कर्म नाहीसं करता येईल यात नवल कसलं?

मन, वाणी, शरीराद्वारे केलेल्या कर्मात यश देण्यासाठी उत्साहपूर्वक प्रवृत्तीच मुख्य साधन आहे. मनानेच एखाद्या वस्तूंची इच्छा करणे व त्याच्या प्राप्तीसाठी शास्त्रशुद्ध प्रयत्न न करणे म्हणजे फलासंबंधीची प्रयत्न विरहीत इच्छा पुरुषार्थाच्या प्राप्तीला योग्य नाही. शास्त्रशुद्ध प्रयत्नाने उत्तम फळ मिळते. व अशास्त्रीय प्रयत्नांनी अशास्त्रीय फळ मिळते तो ज्याप्रमाणे कर्म करतो त्याप्रमाणे त्याला फळ मिळते.

आपलेच पूर्वकर्म फलोन्मुख झाले म्हणजे आपण त्याला दैव असे म्हणतो.

या जगात नाना तऱ्हेची बुद्धि, आकार धारण करून जीव जन्माला येतो; व आपल्या पूर्वकर्मानुसार भोग भोगत असतो. या भोगातून आपली सुटका करून घेणे हे प्रत्येक जीवाने आपल्या मनातून आपण एक केवळ प्रभावहीन, दुर्बल, दुःखी, दैवाधीन जीव आहोत ही भावना काढून टाकली पाहिजे. प्रत्येक व्यक्तिमध्ये अशी एक दिव्य शक्ति आहे की जी सर्वशक्तिमान, निर्भय व आनंदस्वरुप आहे.

आत्म्याच्या अपरोक्षानुभीती शिवाय, जीवन मरणाच्या चक्रातून जीवाची कधीच सुटका होणार नाही. म्हणून विवेक-वैराग्य संपन्न होऊन आत्मज्ञानी पुरुषाची सेवा करुन त्यांनी दाखविलेल्या मार्गाने सतत प्रयत्नशील राहून मोक्ष प्राप्ती करुन घ्यावी. श्रुतिसुद्धा गुरुसेवेलाच मोक्षप्राप्तीचे साधन मानतो कारण गुरुसेवेनेच शिष्याचे मन शुद्ध होऊन आत्मसाक्षात्काराला योग्य असे बनतो कीं, ज्यामुळे तो मोक्ष प्राप्त करण्यास प्रात्र होतो.

---

**जीव शीव दोन्ही हरिरुपी तरंग। सिंधू तो अभंग नेणे हरि ॥**

---